**6. प्रवास भत्ता देयक -** शासकीय कर्मचारी कार्यालयीन कामकाजानिमित्त् मुख्यालय सोडून बाहेरगावी दौरा करतात. अशा वेळेस त्यांना प्रवास भत्ता अनुज्ञेय असतो. प्रवास भत्ता देयकाची मागणी करताना कर्मचाऱ्यांनी खालील कागदपत्रे सादर आवश्यक आहे. सदर मागणी प्रवास पूर्ण झाल्याच्या एक वर्षाच्या आत कार्यालय प्रमुखाकडे करणे आवश्यक आहे.

1. अर्ज
2. दैनंदिनी
3. ज्या आदेशान्वये दौरा केला ते आदेश

प्रवास भत्ता देयकाची मागणी करताना शासन निर्णय दि.03.03.2010 मधील तरतूदीं विचारात घ्याव्यात.